**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ठाणे**

(आस्थापना शाखा)

पहिला मजला, आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, कोर्ट नाका, ठाणे (प) ४०० ६०१.

दुरध्वनी क्र. २५३४३६३६ (विस्तार २११) फॅक्स क्र. २५३४९२०० ईमेल – est.collectorthane@gmail.com

---

क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/प्र.क्र९१/२०१७, दिनांक: १७/०७/२०१७

विषय :- तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या तलाठी कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०१७ ची जेष्ठता दर्शवणारी प्रारुप जेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

**ज्ञापन** :-

ठाणे जिल्हयातील तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या तलाठी कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०१७ ची जेष्ठता दर्शवणारी प्रारुप जेष्ठता यादी प्रसिध्द करणेंत येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मधील नियम ३ (क) व ४ (१) मधील तरतूदी तसचे शासनाकडील पत्र दिनांक १८/०२/२०१२, दिनांक ०९/१०/२०१३, दिनांक ०६/१२/२०१३ व शासनाकडील परीपत्रक दिनांक ३१/०१/२०१४ व त्याच प्रमाणे महाराष्ट्र दुय्यम सेवा विभागीय परीक्षा (तलाठी संवर्गाकरीता) नियम १९९७ व तलाठयांच्या संवर्गातून मंडळ अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा नियम १९९८ विचारात घेवून महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर परीक्षा उत्तीर्ण होणेपासून सूट दिलेल्या तलाठीची प्रारुप जेष्ठता यादी तयार करण्यात आलेली आहे.

सर्व उपविभागीय अधिकारी / तहसिलदार / कार्यालय प्रमुख / शाखा प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, सदरची जेष्ठता यादीच्या प्रती संबंधित तलाठी कर्मचारी यांचे निदर्शनास आणून संबंधितांची त्यावर दिनांकासह स्वाक्षरी घेण्यात यावी. तसेच सदरची जेष्ठता यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर जेष्ठता यादी मध्ये काही त्रुटी राहील्याचे अथवा दुरुस्त करावयाचे संबंधिताने निर्दशनास आणून दिल्यास त्यांचे लेखी स्वरुपात म्हणणे घेऊन, त्यांच्या कागदपत्राची पडताळणी करुन, अहवाल जेष्ठता यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, ही बाब संबंधितांच्या निर्दशनास आणून दयावी. सदरची यादी या कार्यालयाच्या www.thane.nic.in संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-
(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रत :-

१) अपर जिल्हाधिकारी ठाणे यांना माहितीसाठी
२) उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
३) उपविभागीय अधिकारी, .......................
४) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) ..........................
५) उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
६) तहसिलदार, ...............................
७) शाखा प्रमुख, ..................................................., जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
८) शाखा प्रमुख, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
२/- सदरची जेष्ठता यादी या कार्यालयाच्या www.thane.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. सदरची जेष्ठता सूची १५ दिवस संकेतस्थळावर ठेवण्यात यावी.
९) आस्थापना आदेश संचिका

तहसिलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे